म. ग्रं. सं. ठाणे

विषय नाटक

सं. ८६९

१८८३

म. ग्रं. सं. ठाणे

विषय

२ - ६

संग्रहालय क्रमांक

८६९

लेखक

सन

पुस्तकाचें नांव स्त्रीचरित्राचें चित्रदर्शन

प्रहसन

३५।

३५

नाटक

ग्र. नं.
32

नं. ५३४

नं. 32
(५३४)

नं.
ता.

श्री.

# स्त्रीविद्यावैचित्र्यदर्शन प्रहसन.

अलीबाग

'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें.

सन १८८२ । शके १८०४

किमत २॥ आणे.

# सविनय सूचना

प्रहसनांत दाखविलेला प्रकार निघालेल्या उद्गारान्वयें साधारण रीतीनें दाखविला आहे. कोणास शांत विचारांतीं प्रत्ययास येत असल्यास योग्य बंदोबस्त करण्याकडे त्याचें दुर्लक्ष होऊं नये. प्रत्येकानें प्रत्येकाच्या सुखा करितां झटावें हा योग्य मार्ग आहे, परंतु त्या झटण्यापासून परिणाम दुःखदायक व भयंकर होत असेल तर तो मार्ग विशेष चर्चा केल्यावांचून अभिप्राय सोडावा हें विशेष विहित आहे.

# स्त्रीविद्यावैचित्र्यदर्शन प्रहसन.

—o-o—

## प्रवेश १ ला

( स्थळ—माधवरावांचा दिवाणखाना. )

पात्रें—चार स्नेही, माधवराव, रंगराव, वामनराव, त्रिमणराव.

मा०— We will not shine ourselves in the civilized world, so long we shall keep our wives in the dungeons —

र०— I say— Mr. Madhawrow—what you say is quite rigbt—but what could be done with these old folks I know not?

वा०—कां त्रिमणराव, या वेद्याविद्यांच्या अंतःकरणरूपी जमिनीवर दरबां रावबहादुरांनीं दिलेल्या लक्षराचा अंमलांकुर तर लवकर फुटला! तुमच्या अंतःकरणावर त्याचा कसा काय प्रकार झाला सांगा पाहूं?

त्रि०—आमचें अंतःकरण आज काय विचारतां, खडकावरील खडतर जमीन. तिजवर प्रकार कसला आणि काय कसलें? आम्ही कां बी. ए. कीं एल. एल. बी. झालों आहोंत, कुठें यस. पी. करतां येण्यापुरतें आमचें ज्ञान, आम्ही कशाला स्त्रीविद्येचा डौल घालावा? आणि करनिच राववल त्रिया आमचे काय उपयोगी पडणार?

मा०—हे बोलिले मोठे शहाणे!!! Look at tnis wise fool!

वा०—माधवराव, त्यांच्या बोलण्यांत कांहीं अर्थ आहे खरा, पण तुमच्या लक्षांत येत नसेल तर निराळी गोष्ट आहे.

र०—हें असेंच का तुमचें अंतःकरण पाश्चिमात्य विद्येनें प्रकाशमान झालें? तुमच्या विचाराविषयीं आम्हांला मोठा भरवसा होता, पण तुम्हीही याच मनुष्यांच्या पंक्तींत गोवून घेतलेंत.

वा०—तुमच्या चकचकित ज्ञानज्योतीनीं ज्यांत आमची गणना होईल ती खरी—पण आम्ही तर बाबा तुमच्यासारिखे असल्या व्यवहारशून्य

शेंकडों रावबहादूरांच्या, किंवा रावसाहेबांच्या, किंवा पंडितांच्या, किंवा मिस्तरांच्या, किंवा हितशत्रु उपदेशकांच्या लांब लांब व्याख्यानांना मुळून शेपरणारे गडी नाहीं. ते तुमचे रावसाहेब, रावबहादूर, ते तुमचे उपदेशक, आणि ते तुमचे तुह्मी, सांगड ठीक.

मा०—नः वामनराव, मी ह्मणत होतों कीं, स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें तुमचे आमच्याहीपेक्षां फार पोक्त विचार आहेत.

वा०—वर मग, नाहीं कोण ह्मणतो, आहेतच.

रं०—हे चिमणराव स्त्रियांना 'फरनिचर' ह्मणतात, आणि त्यांना हे मान डोलवितात! आणि पुन्हा प्रवाढून ह्मणतातच कीं, "वर मग, नाहीं कोण ह्मणतो, आहेतच" काय ह्या वामनरावांच्या बोलण्यांत अर्थ आहे?—A man having received so much education still holds the opinions of the man of the old stamp—मोठाच चमत्कार! अजूनही असल्या शहाण्या लोकांनीं जुन्या मतांत प्रौढी मारावी!

चि०—काय हो तुह्माला जुन्या मतांचें महत्व ठाऊक आहे?

रं०—जुनीं मतें हीं असलीच तुमची कीं नाहीं? कीं वैश्वदेवाची वेळ आली, कीं बसा कासोटा सोडून, व्हाऊंच्या वारा.

वा०—व्यवहारज्ञानशून्य यांना जें ह्मणायचें तें याच करितां.

मा०— कां रागावतासे?

वा०—रागावण्याचें मला कारण? आणि तुह्माला मी रागावण्याचा संशय आला?

चि०—तुह्मी त्यांना मघांपासून व्यवहारशून्य व्यवहारशून्य ह्मणत आहांना? त्याचा येतो आहे त्यांना राग. पण तसें न बोलतां तो राग ते तुमच्या वरच घालताहेत.

वा०—हं हं, असें का. माधवराव तर बिल्कूल मला राग नाहीं. आणि तुह्माला राग येण्या सारिखें ही कांहीं आह्मी बोललों नाहीं. खऱ्या खऱ्या ज्या गोष्टी दिसतात त्याच काय त्या मी बोललों. तुह्माला आदर

त नसेल तर बापडा मी या बाबतींत मुळींच बोलत नाहीं. उगीच तुमचीं आमचीं परस्पर मनें कशाला दुखवावीं?

मा० —अः त्यांत कांहीं नाहीं. पण चांगल्या, शहाण्या, विद्वान, मोठ्या हुद्यावर असणाऱ्या लोकांना एकदम व्यवहारशून्य वां ह्मणून ह्मणावें? त्यांना काय अगदींच कांहीं समजत नाहीं असें कशावरून ह्मणावें? हें बरें नाहीं. फार पाजीपणाचें काम आहे मला वाटतें.

चि० —यांनीं मात्र आमच्या जुन्या मंडळीला किंवा त्यांच्या मतांत असणाऱ्यांना Old stamp—By fool—Stupid—Nonsense—Donkey—अशा राजकीय शब्दांनीं वाटेल तेव्हां आणि पाहिजे त्या ठिकाणीं वाटेल तीच शब्दांचा भडिमार करावा, आणि त्यांना मात्र आपल्या घरच्या बैठकींत व्यवहारशून्य ह्मटलेलें यांना खपत नाहीं. काय न्याय हा! वाह वारे वा!

रं० —It's not joking my good friends—हें कांहीं थट्टेचें प्रकरण नाहीं, देशाची सुधारणा करण्याचें हें काम आहे आणि या कामास चांगलींच डोकीं लागत असतात. हीं तुमच्या सारखीं अडमुठी माणसें उत्पन्न झालीं त्या योगानें आमचा देश सगळा भिकेस लागला!!!

चिं० — एकूण आह्मी आडमुठी माणसें? काय जे इंग्लंडाहून उतरलेले बृहस्पतिचे तारे ते तुह्मी. वहावा वहावा. तान्यांनो तुह्मांला एकून नमस्कार असो, तुमची विद्या आणि तुमचे ते विचार तुह्मालाच लखलाभ होवोत.

रं० — ह्या कुचकट बोलण्यांत कांहीं अर्थ आहे?

मा० — राहिलें तें कुचकट बोलणें. पण तुमची ती देशाची सुधारणा ह्मणजे काय बंड आहे, आह्माला पुर्तेपणी कळूं तर द्या. मग आह्मीही पण तुमच्या सुधारण्याच्या मदतीला लागूं.

रं० —ती तुमचीं देशाचीं सुधारणा करण्याचीं डोकींच नाहींत.

मा० — जरी त्याचीं सुधारणा करण्याचीं डोकीं नसलीं तरी हा विषय

ऐकून ऐकून त्याचेंही मन आपल्या सारखें होईल. वामनराव देशाची सुधारा ह्मणजे काय हें समजलात कां तुह्मी? परवा रावबहादुरांनीं दिले त्या लेक्चराला जर तुह्मी आले असतेत तर—ओहो—काय तुमची चांगले प्रकारची समजूत झाली असती. ती सुधारणा सर्व कलमें आपल्या घरांतून झालीं पाहिजेत आणि तीं होण्यास मुख्यत्वें करून पहिल्यानें स्त्रिया सुशिक्षित केल्या पाहिजेत.

वा०—माधवरावजी. एकूण आपल्या बोलण्याचा भाव काय तो मी समजलों, कीं देशाची खरी सुधारणा ह्मणजे काय तो स्त्रियांना विद्या शिकवायची? होय कीं नाहीं?

मा०—हो ह्मणजे काय? असें कांहीं माझें एकट्याचेंच मत नाहीं, रावबहादुरांनीं पण परवांच्या लेक्चरांत हेंच सांगितलें.

वा०—येकूण देशसुधारणूकेची मुख्य गोष्ट काय ती स्त्रियांना विद्या शिकविणें हेंच ना?

मा०—यांत काय संशय? त्यांना विद्या प्राप्त झाली असतां स्वातंत्र्य ह्मणजे काय आणि त्याचा उपभोग कसा घ्यावा हें कळूं लागून काय जी पुरुषी ती केवळ धुरांड्याचे स्वयंपाक घर आणि ओसरीच्या आंतलें माजघर येवढेंच न वाटून संध्याकाळच्या प्रहरीं एकाद्या नदी किनाऱ्यास, तळ्यांच्या कांठीं, अथवा इंग्रजी अगर म्युनिसिपालिटीजनीं बांधलेल्या बागांत अथवा समुद्र किनाऱ्यावर जशा ज्या ठिकाणीं सोयी असतील, त्या प्रमाणें आपल्या मित्रमंडळी सह सहल करण्यास जाण्याचें त्यांना धारिष्ट येण्या सारिखे त्यांचे विचार फैलावतील.

वा०—येकूण शिक्षणाच्या द्वारें आतां आपण गोष्टी बोलला इतक्या स्त्री यांना कळल्या ह्मणजे तुमची देशसुधारणा होते असें का मी समजूं?

मा०—या शिवाय आणखी दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आहेत, परंतु त्यांत मुख्यत्वें करून ही गोष्ट आहे असें रावबहादूरांचें ह्मणणें आहे, आणि तें क

ह्मा सर्वांस मान्य आहे. तुमच्या मनांत आमच्या स्त्रीयांनीं जन्मभर कोंडवाड्यांतच राहवें असें कां तुह्माला वाटतें?

वा०— छे छे बुवा; विष्णवेनमः आमच्या स्त्रियांना कधीं कोंडवाडा प्राप्त व्हावा असें कोणाच्या कधींही स्वप्नी देखील यावयाचें नाहीं आणि आमच्या स्त्रियांची अनगरी स्त्रियां प्रमाणें रहण झालेली कधींही कोणाच्यानें पाहिली नाहीं, असें असतां मग हे तुमच्या सारिख्या, व दळच्या बुरच्या राव बहादूरांच्या डोक्यांत काय वेड शिरलें असेल तें असो. हो, आतांशा कोंडवाडा ऐकून आपण प्रथमारंभींच dungeon—असा शब्द योजल्याची आठवण झाली. बर कांहो— तुमच्या स्त्रिया कधीं देवदर्शनाला जात नसतीलच नाहीं? अथवा हौदावर किंवा नदीवर पाण्याला जात नसतीलच नाहीं?

मा०—देवदर्शनाला गेल्या!—What of that, I would not like our females should go out and visit temples—a most foolish thing in the world—Mr. Wamonrow—were you not there when दि मूर्तीपूजा खंडण स्त्रियीं त्या विडा उचललेल्या प्रसिद्ध पंडितानें व्याख्यान दिलें?

वा०—Mr. Madhawrow–let that मूर्तिपूजा subject go aside for a short time. त्या प्रसिद्ध पंडिताचें व्याख्यान ऐकल्या पासून तुह्माला देवदर्शन पाहिजे तर न आवडो परंतु अजून पर्यंत तुमच्या घरच्या बायका देवदर्शनाला जाण्याची, लग्नकार्यांत थाटानें मिरविण्याची कोणी कांहीं बंदी केली नाहीं येवढी गोष्ट मात्र खरी आहे?

मा०— बर मग.

वा०—मला तेवढेंच पाहिजे होतें. ह्मणजे आमच्या स्त्रियांच्या संबंधानें झालेला समज तुमच्याच साक्षीवरून खोटा ठरतो. तो असा कीं आमच्या बायका झनान मध्यें अथवा कोंडवाड्यांत कधींहीनव्हत्या, आतांही नाहींत आणि अजून पर्यंत पुरुषां कडून कोणत्याही प्रकारचा त्यांना काच होतो

अगर पुरुष त्यांच्या इच्छेविरुद्ध वन्या न्यायानें त्यांच्या स्वातंत्र्या आड आले आहेत असा त्यांचाही पण समज झाला नाहीं. पण तुमचा असला वेडगळ समज होण्याचें कारण काय आहे हें त्या राव बहादुरांना ठाऊक. कारण परवांच कोठेंशी गोष्ट निघाली होती आणि ती बातमी बहुत करून आतां गावभर पसरली आहे. रावबहादूरांचें कुटुंबच स्वतः बोलत होतें कीं; "आमच्या घरच्या वेड्यावेड्या चाळ्यांनी तर मला बाई आही भगनान जसें कांहीं होऊन गेलें आहे. जिनें तिनें बोलावें--यांचेच होते यजमान, आतांशा बायकांच्या कल्याणाला लागले आहेत जळे मेले हे आमचें कल्याण करणारे. आमचा भाव यांच्यावरला बसले आहेत. आणखी दुसरें कांहीं नाहीं. यांनीं एकदा बायकांची जात निःसंग केली ह्मणजे झालें" ऐका या राव बहादुरांच्या घरच्या गोष्टी. तुमचे व्याख्यान कार गुरू!!

मा०—तुमच्या मनांत हा विषय येव्हांशी भरायचा नाहीं. कारण तुह्मी लोक आहात फाजील. आमच्या रंगरावाची समज या विषयांत फार चांगली आहे. आणि देशकल्याण ह्मणजे काय हें तोच चांगलें समजतो.

वा०—बर तर बाबा तुमचा रंगराव आणि तुह्मी घाला गोंधळ आणि करा देशाचें कल्याण. आह्मी घेतों रजा.

मा०—बराहे, यावें. फार बर, फार बर.

(वामनराव आणि चिमणाजीपंत जातात)

मा०—कसें काय रंगराव, या वेळेस देशाची सुधारणा करण्याला लागायची वेळ आहे ह्मणून जुन्या लोकांच्या वेडसर समजुतीला न जुमानतां आपण तर आपल्या बायकोला शिकविण्याची व आपल्या बरोबर सभांना नेण्याची, त्याच प्रमाणें संस्कृत नाटकांत नेण्याची व हवा खायला नेण्याची सवय लावणार. तुह्मा कसा काय विचार?

रं०—I am just to follow you— आणि देशसुधारकांत आपलें नांव खोदून देण्याची पण संधी मोठी छान आहे.

मा०—It's all true but how will you do this? I mean with those old buffers.

रं०—Oh! I care a pin for them. I have every right over my wife. Well now, it's too late, I am going now, we will see each other this day next week and have a talk on the subject.

मा०—Well good morning.

रं०—Good morning, good morning.

(दोघे जातात.)

---

# प्रवेश २ रा

(माधवराव आणि त्याची बायको मथूबाई)

मा०—आज आपण दुपारी घर आला होता त्या वेळेस आह्मी आपल्याला बोलाविलें असून आपण आला नाहींत?

म०—व: बोलायला काय होतं—

मा०—व: बोलायला काय होतं ह्मणजे, आह्माला कांहीं कोणाची भीती का आहे?

म०—आपल्याला भीती कोणाची असणार? वेळ नाहीं अवेळ नाहीं. सासूबाईच्या बरोबर मी काम करीत होतें. वेळ अवेळ पाहून मला बाई भीती वाळगावी लागते.

मा०—आह्मी समजत होतों कीं आपण फार शहाण्या आहात आणि देशसुधारणुकीच्या कामाला आपल्या कडून आह्माला पुष्कळ मदत मिळेल

म०—बाई तरी नवलच हें बोलायचें! मला नाहीं कांहीं असलें समजत.

मा०—आपल्याला समजत नाहीं तेंच शिकवायचें आमच्या मनांतून आहे.

म०—कधीं कोणाला शिकवायचं झालं होतं आणि मी नाहीं म्हटलं?

मा०—लांब कशाला, आजच दुपारी आह्मी आपल्याला बोलाविले होते ना? आलात का आपण?

म०—आजची मेली राहिली गोष्ट दुपारची. इतक्या दिवसांत रात्रींच एक दिवस तरी कांहीं शिकवणं झालं का? मी यावं, निजावं, आणि सकाळीं उठून डोळे चोळीत खालीं उतरून जावं, असंच चाललं आहे ना?

मा०—आजपर्यंत आमच्या पाठीमागें एलएलबीचा लकडा लागला होता. आपल्याला ठाऊक आहेच. आतां नुकतेसे कोठें आह्मी मोकळे झालों आहोंत, तों आमच्या पाठी मागें हें दुसरें डोळ्यांचें शुक्लकाष्ठ लागलें आहे. पहातांना ही आमच्या डोळ्यांची काय दशा उडाली आहे?

मा०—मधून मधून खोकल्या दम होतच असतो. पण हा इतका अभ्यास केला नसता तर चाललं नसतं का!

मा०—आमच्यासारखा आपण जर अभ्यास करतां तर असला वेडगळ प्रश्न विचारतांच ना, आणि आमचे दुपारच्या बोलावण्याला त्या जुन्या वेडसर माणसाची सबब सांगतां ना. आपल्याला ठाऊक आहे कीं, जुनीं माणसें ह्मणजे निवळ जशि कांहीं उंदराचीं खोडें, त्यांना कितीहि सांगा, कितीहि शिकवा, पण त्यांची एक जी जुनी चालत आलेली चाल आहे ती ह्मणून त्यांच्याकडून कधींहि सुटणार नाही. बायकांनीं पुरुषांत येण्याला, दसण्याला, बोलण्याला, हसण्याला काय हरकत आहे? ह्या असल्या विचारशून्य प्रतिबंधांनीं तर आमच्या सुवर्णमय देशाची राख रांगोळी त्यांनीं करून टाकिली

म०—हें काय बाई कुणिकडल्या कुणिकडे कांहींतरी बोलायचें, त्याला ताळ ना तंत्र. बायकांनीं पुरुषांच्या जवळ येऊन काय करायचें आहे?

मा०—Want of education in thoughts आपल्याला education व शिक्षण I mean विद्या नाहीं, तेव्हां विचाराच्या संबंधानें आपल्यांत ही उणीव आहे हें खरंच आहे वर पुरुषां प्रमाणें पाहिजेल तें करण्याला आणि पाहिजे तसें वर्तन करण्याचें तुम्हाला पूर्ण liberty, I mean, स्वातंत्र्य अथवा मोकळिक असावी हें आपल्याला बरोबर नाहीं कां दिसत?

म०—अहो आम्हाला पुरुषां प्रमाणें सगळ्याच गोष्टी करतां येण्या सारख्या नाहींत तिथें काय कोणी करावें?

मा०—काय न करतां येण्या सारिखें आहे. आम्हाला तर कांहीं दिसत नाहीं. खावें प्यावें, Exercise, I mean उड्या माराव्या, शिक्षण घ्यावें, हवा खायला जावें, लेकचर्स द्यायला व ऐकायला जावें, संगित शाकुंतल नाटका सारखीं कामोद्दीपक करणारीं सभ्य नाटकें पाहायला जावें, पुरुषांत जाऊन त्यांच्यासी खेटून बसावें, चार पब्लिक विषयावर गोष्टी बोलाव्या, जुन्या वाईट चाली, ज्यांनीं आमच्या देशाला भिकेस लागलें त्या सोडाव्या या सर्व गोष्टी आणि तुमच्या मनांत निरनिराळ्या वेळीं उत्पन्न होणाऱ्या करण्यास कांहीं हरकत नाहीं. वेलाशक कराव्या आणि आम्ही म्हणतों त्याला आमच्या पाश्चिमात्य लोकांच्या स्त्रियांचा आधारही आहे. त्यांचा एकदां का बाल सुरू झाला म्हणजे पाहिजेल तिथें पाहिजेल त्याचा हात धरून सर्वां देखत नाचावें, आणि आमच्यामध्यें आमच्या बायकोनें दुसऱ्याकडे पाहतां देखील उपयोगी नाहीं. It's a shame.

म०—आजपर्यंत कधीं एक शब्दही बोलायचें झालें नव्हतें. आणि आज दुपारची मी आलें नाहीं. काय तो एवढा अपराध झाला.

मा०—छे छे, आपण कांहीं असें समजूं नका; कीं, आपण कांहीं अपराध केला, परंतु तो अपराध आतां आम्हीच आपल्या अंगावर घेतों. कारण आपल्याला शिक्षण देण्याची आम्ही पूर्वीच जर कांहीं तजवीज

केली असती, तर आपल्या हातुन असा अपराध कधीं घडलाच ना. परंतु आतां मात्र आह्मांला या सर्व तजविजी केल्या पाहिजेत. परंतु—

म०—तजविजी त्या काय करायच्या?

मा०—आतां एक आपल्याला शिकविण्या करितां मास्तर ठेवला पाहिजे. आपल्याला फिरायला जाण्याचा एक पोषाक आणला पाहिजे. आपल्या मनांत सोवळ्या ओवळ्याचे विचार फार आहेत ते आधीं काढून टाकले पाहिजेत. खाण्याच्या कामांत डाक्टरच्या ह्मणण्या प्रमाणें थोडा फेरफार केला केला पाहिजे. अशा कांहीं वरच्या गोष्टी एकदम करायला पाहिजेत. but I don't know how I shall be able to defray all these expenses!

म०—मी नाहीं बाई मास्तराजवळ शिकायची. मी आतां लहान कां आहे? आपण शिकविलें तर नाहीं कां चालायचं? आज पांच रुपये मास्तराला महिना खर्च ह्मणून कराचा तो आपण शिकवून महिन्याच्या महिन्यास मला पांच रुपये दिले तर २५ रुपये जमल्यावर माझ्या नाकांतलें सुंकलं नाहीं कां जायाचं? नाक कान बुचे, तिकडे कुणाला पाहायचं नाहीं, आणी ह्मणायचं ठेवतों मास्तर आणि जा हवा खायला. घरांतलं काम करून जीव मठ्यास येतो आणि असं होतं कीं केव्हां एकदां अंथरुणावर आंग टाकीन.

मा०—That is what I am thinking. वर पण शिकायचं आपल्या मनांत आहे ना?

म०—शिकायचं तें काय मला बाई कांहीं समजत नाहीं. मी अक्षरांची थोडीथोडी ओळख करून घेतली आहे.

मा—बस! That's what I wanted. आमचा एक पांच रुपयांचा खर्च वाचला. आतां बाकीच्या गोष्टींना फारसा खर्च नाहीं. पुरुषांनीच फक्त पैसे मिळवावे आणि स्त्रियांनीं मांडी मांडीवर ठोकून खुशाल बसावें हें

कांहीं अर्थशास्त्राला अनुसरून नाहीं. पण आमच्या या देशांत भिकार चाल पडली आहे तिला काय करतां? बायकांनीं मात्र घराचा उंबरठा सोडून बाहेर जाऊं नये, आणि पुरुषांनीं मात्र चहूंकडे वणवण हिंडावें. वः काय न्याय आहे हा? हे आमच्या तोंडांतून निघालेले उद्गार आपल्याला जरा विलक्षण वाटले असतील मी समजतों, पण आपल्याला थोडेसें शिक्षण मिळालें, आणि आपण युरोपियन देशाचे इतिहास वाचूं लागला, ह्मणजे आह्मी जे आतांच रिमार्क केलो तिचें याथातथ्य आपल्या सहजीं लक्षांत येईल अशी आमची पूर्ण खातरी आहे. आणि आह्मी सांगण्याचे पूर्वी आपण अक्षर ओळख करून घेतलीत, ही आह्माला मोठी आनंदाची गोष्ट आहे आणि आपल्याला education देण्या विषयीं आतां आह्मी झटावें या करितां आतां आह्माला मोठें उत्तेजन आलें आहे

म० —आतां अशा भाकडकथा किती रात्र पर्यंत बोलत बसायच्या तरी? मला बाई यायला लागली झोंप.

मा० —हं, निजावें आपण. देशकल्याणाच्या गोष्टीकडे कां एकदां आपलें मन गुंतलें, ह्मणजे आपलीही झोंप आमच्या प्रमाणेंच नाहींसी होईल.

म० —राहून राहून देश कल्याण ह्मणायचं होतं, हें आहे तरी काय? आह्मा बायकांना कंबरेवरून पाण्याच्या घागरी आणतां आणतां कंबरेचा खड्डा होतो मोकळा तरी हवा खायला जाण्याची गोष्ट निघून त्यांत देश कल्याणाचें घोडें आहेच पुढें. शिकायचं तरी देश कल्याण आहेच. खायचं तरी देशकल्याण आहेच.

मा० —देशकल्याणाच्या संबंधानें आपली आतां हळू हळू समज होईलच. परतु उद्यांपासून आपण असें करावें, लक्षांत ठेवा कसें तें— पाणी आणण्याचें आणि तांदुळ सडण्याचें काम आपणच करूं नये. मि० गोपाळ हा आपल्याला शिकवायला येत जाईल. त्याच्या बरोबर आपण एकटया या माडींत शिकत बसावें पांच वाजतां ब्याकवेवर आपण कोणाला तरी बरोबर घेऊन हवा खायला यावें. ह्मणजे तेथें आमची

व आपली गांठ पडेल. आदितवारीं रात्रीं सात वाजतां मिसेस रानडे हॉलमध्ये "स्त्रियांचें दुःख" या विषयावर व्याख्यान देणार आहेत, तें ऐकण्यास जाण्याचा आपला पहिलाच प्रसंग आहे. सबब आमची स्वारी त्या दिवशीं आपल्या बरोबर येईल. हा प्रोग्राम आतां नीट लक्षांत ठेवा आणि स्वस्थ निजा कशा.

म०—सासूबाई झाल्या आहेत आतां म्हातार्‍या. त्यांच्यानं कांहीं काम होत नाहीं मी तांदुळ सडले नाहींत आणि पाणी भरलं नाहीं तर खायला कसं मिळेल?

मा०—त्या थेरडीला तिच्या अज्ञानी राहण्याच्या पापाबद्दल तिला हीच शिक्षा पाहिजे.

म०—संसार अजून मामंजीच्याच अंगावर चालला आहे, त्यांना हें समजलें म्हणजे काय म्हणतील?

मा०—काय म्हणायचं आहे त्यांनीं? त्यांच्या बायकोची त्यांना कींव आली तर ते पाहिजे तर दोन चाकर ठेवतील. आणि असें न करतील तर ते मूर्ख आहेत असें मी खास समजतों.

म०—एकूण आपल्या मता प्रमाणें मी वागलें म्हणजे झालं ना? माझ्या विचाराच्या करितां त्यांना शिव्या नकोत. पण आपला मात्र पुढचा विचार आपण पाहावा. मी झालें आतां स्वतंत्र!!

मा०—बस! आमचा विचार आम्ही पूर्वींच केला आहे. त्या विषयीं आपल्या ला काळजी नको. निजा आतां स्वस्थ. पण सांगितलेल्या गोष्टी मात्र नीट लक्षांत ठेवा.

(दोघें निजतात.)

---

## प्रवेश ३ रा

(स्थळ रंगरावाचा दिवाणखाना)

पात्रें— रंगराव आणि आनंदी.

रं०—Well Anne, how are you? Go on speak.

आ०— हं, घरून बाहेर पडायचें झालें होतं त्या वेळेस ते मेले सोळभोक आले होते. रोज कानी कपाळीं ओरडत असायें पण मेली ती जिव्हाची खोड जाते कशी? मामंजी सांगून सांगून दमले, सासूबाईनी होती तित की पराकाष्ठा केली. नाहीं नाहीं तसल्या शपता त्यांच्या जवळ वाहिल्या मध्यें चार दिवस तरी जायचे होते! आतां ओकाबोक सुरू होईल.

रं०—Oh, fear not my dear! my bosom friend, half partner of life. आह्मी शुद्धीवर आहोंत. आह्मी शपत घेतलेली आह्माला स्मरते आहे तसा कांहीं आज प्रकार नाहीं.

आ०—बाई त्या घाणीनें मला उमळायला लागलें. नको तें शेजारी येणें.

रं०—हें काय असें? ब्रांडीचा ग्लास न पिण्याविषयीं आपण शपत वाहिली ती कांहीं मोडली नाहीं. आज संध्याकाळीं एका साहेबानें बंगल्यांत बोलावलें होतें तेव्हां त्याच्याकडे जाणें जरूर पडलें. त्यानें डिनरचा फारच आग्रह केला. त्यांच्याजवळ आमच्या चाकरीच्या संबंधानें आहे काम ह्मणून नाहीं कांहीं ह्मणतां येईना. पण तुझ्याच गळ्याची शपत त्या भिशमवले सोफिश आणि मटनचाप याला हात लावला असेल तर. बरोबर चाकू काटेचांनीं भराभर उचलले ते एकदम घशाच्या आंत फेकून दिले आणि वर सोदे दोन बाटल्या झोकून दिल्या, पण राहालों सोंवळा. हाता तोंडाला ह्मणून त्या जिनसांचा स्पर्श नाहीं.

आ०—जळली ती शपत. असं शेण पुन्हा खायचं होतं तर ती कशाला वाहायला पाहिजे होती? सगळा भ्रष्टाकार घरांत. लोक तोंडावर थुंकताहेत, त्यामुळें मामंजीनी मुरलीधराच्या देवळांत पोथी वाचायला जाणंच देखील सोडलं. जे तें त्यांचं तोंड दुखावतं पोटीं येऊन चांगला लौकिक मि

ऊविला ह्मणतात हो!!! चांगलें आरंभलें आहे!

रं०—चर जाऊंद्या. त्या सगळ्या जुन्या समजुती आहेत. मांस खाल्ल्या पासून शरिराला पुष्टाई, कोंबडीची अंडीं खाल्ल्यापासून संतती सतेज, दारू प्याल्यापासून आंगबळ, वगैरे शोध जे अलिकडील विद्वानांनीं लाव ले आहेत ते काय मुरलीधराच्या देवळांत बायाबापड्यांना आणि धर्म भोळ्या लोकांना फसविणाऱ्या पुराणिकाला समजत असतात? या अस ल्या रद्दकथा गाऊन तर या लोकानीं आमचा सगळा देश भिकेस लाव ला!!! बेवकुब कुठले.

आ०—आतां कसा राग येतो. पण अजून त्यांचंच अन्न खायचं चाललं आहे. ते काशीला जातों ह्मणताहेत, गेल्यावर मग डोळे पांढरे होतील. मामंजीना ह्मणून थोडेसे लोक भितात, नाहीं तर आपल्या या कर्माकरितां कधींच पडला असता—

रं०—Dam that बहिष्कार. ती पेशवाई बुडाली. भटांनीं ह्मणावें तु ह्मी आतां ती बहिष्काराची लफंगिरी विसरा. जों पर्यंत पिनलकोड पाहिला नाहीं तों पर्यंत या चेष्टा. गांठ माझ्यासी आहे. त्यांनीं म ला बहिष्कार मात्र घालावा ह्मणजे त्यांची चमडी कशी करतों ती तर पहा. बरं तें राहूं दे आतां. आतां नव्या समजुती, नवे विचार, नवे पे हराव, नवी रीत यांची आतां आमच्या देशकल्याणाच्या कामाला जरूर आहे. त्याप्रमाणें तुला वागायचं आहे कीं नाही?

आ०—मी बाई आपल्या सासूबाईनीं घालून दिलेल्या किंत्या प्रमाणें चालणार.

रं०—मग जगांत लोक तुला वेडी ह्मणतील.

आ०—ह्मणतना बापडे. मी आपली सासूबाईची रीत सोडली नाहीं ह्मणजे मिळविली. मी माझ्या आईबापांचं आणि सासू सास ऱ्यांचं नांव राखलं, त्यांत कुणी मला वाईट ह्मटलं नाहीं ह्म णजे पुरे.

— A foolish wife, barbarous, — पण तुला त्यांच्याशीं आतां काय कर्तव्य आहे? तुझा त्यांचा कांहीं आतां संबंधच नाहीं.

आ०—संबंध असो अगर नसो.

रं०—याच करितां आह्मी ह्मणतों बालविवाहाची चाल वाईट. वधू नवरा बायकोचीं मन जुळावीत. हाच आमचा विवाह या थेरड्यांनीं लहानपणीं केला नसता तर आज हा परस्परांत विरोध घरीं आला असता? आह्मी ह्मणतों नव्या चालीनीं चालायचें, ही ह्मणणार नाहीं. आह्मी ह्मणतों मद्यमांस खाण्याला हरकत नाहीं, ती ह्मणते चाली विरुद्ध. आह्मी पुनर्विवाह सशास्त्र ह्मणणार, ही ह्मणणार शुष्कादि कांत. आह्मी ह्मणतों जातीभेद खोटा, ही ह्मणणार हें ढोंग. तात्पर्य लहानपणीं लग्न केल्याचे हे परिणाम आह्माला भोगावे लागतात.

आ०—काय ही उगीच बडबड चालली आहे. निजायचें होतें आतां घटकाभर ह्मणजे ती तार तरी उतरली असती.

रं०—बस! बस!! असलें फाजील बोलशील तर तुझें आमचें पटायचें नाहीं, तूं खुशाल आपली वाट धरावीस आणि आह्माला वाटेल तसें आह्मी करूं.

आ०—एक जन्म पडलें आहे मी पदरीं, देवाला भिऊन जसे दिवस निघतील तसे निघतील.

रं०—या करितां आह्मी ह्मणतों कीं नव्या चालीनीं चाला ह्मणजे वा ही मोडून देऊन पुनर्विवाह करतां येईल. हीच पुनर्विवाहाची चाल असती तर आमच्या देशाचें किती कल्याण झालें असतें. मुर्ख थेरडे.

आ०—देवा हे असले शब्द कानांनीं देखील ऐकवत नाहीं, पण काय करायचें?

रं०—बस! आमच्या मत प्रमाणें तूला चालायचें आहे कीं नाहीं? शा

ळेंत गेलें पाहिजे,. हवा खायला मंडळी बरोबर फिरलें पाहिजे, मंदि रांतून आमच्या हातांत हात घालून आलें पाहिजे.

आ०—माझ्या हातून कांहीं वाईट असें व्हायचें नाहीं. मी घरांतलं सगळे काम करीन.

रं०—आह्माला ठाऊक आहेत तुह्मी मूर्ख आहात त्या. एकूण आमच्या मना प्रमाणें वर्तन करायचें नाहीं, असं आह्मी समजावं?

आ०—आपल्या आज्ञेबाहेर जाणं नाहीं, पण माझा उपयोग घरांतल्या धंदांतच करावा.

रं०—तुमचा आमचा संबंध सुटला तर. आपण स्वस्थ निजावं आतां, आणि आह्मी नवीन आलेल्या शाकुंतल नाटकाला जातों.

( आनंदी निजते व रंगराव नाटकाला जातो. )

---

## प्रवेश ४ था

[ स्थळ—मथूच्या घराची माडी ]

पात्रें—मथु आणि आनंदी

म०—[ आपल्याशीच ] देवानं एकदाचं माझं गाऱ्हाणं ऐकिलन. नाहीं तर कोण मेली रात्रंदिवस या जिवाला भीती लिवून राहिली होती कोणा जवळ चोरून बोलत उभं असावं आणि अवचीत सासूबाईनीं अथवा मामंजीनी सहज खाकरावं कीं लागलंच मेलं पोटांत धसधस होई. आणि जिवाला वाटावं यांनीं पाह्यलं असलं तर काय होईल कोण जाणं. त्यांची इकडे सांगण्याची फार भीती वाटत असे. परंतु तीं फार सज्जन माणसं. माझ्या मामंजी सारखे मामंजी, आणि सासूबाई सारख्या सासूबाई दुसऱ्या कोणाच्या विरळाच नशिबीं मिळण्याचें. आईबाप काय लाड करतील अशा तऱ्हेनं त्यांनीं मला गुलाबाच्या फूला प्रमाणं सासरीं वागविलं आणि मीही तों पर्यंत कोणत्याही

प्रकाराने त्यांना दुःख होईल अशा रीतीनं वागलेच नाहीं. काय जो त्यांचा भरंवसा तो आजपर्यंत माझ्या वरच होता त्यांच्या मर्जी प्रमाणं आमच्या इथें एक दिवस देखील वर्तणुक झाली नाहीं, ह्मणू न त्यांना वारंवार वाईट वाटे. आणि केव्हां केव्हां तर मामंजी डो ळ्यां वाटे पाणी काढीत, आणि उभयता दोघेंच जण असलीं; आणि जवळ मी असलें ह्मणजे ह्मणत— "मथुरे—पोटीं संतान ह्मणून काय जें मुल मानायचें तें केवळ तुझ्यावर. हा *** असला निघा ला! माझ्या मरणाची देखील गुलामानं वाट पाहलीन नाहीं—तोंच रस्त्यामध्यें कांहीं वेडे वेडे चाळे करूं लागला. शेवटच आमचे, त्या ला तो काय करील." कुठून मेली ही मला आज त्यांची आठवण झाली कोण जाणें! आठवण न होती तर मी सुखांत असतें. आ मच्या यांच्या—वेड्या पिरांच्या कुशीनें ह्मणण्याला कांहीं भय वा वा टतें! असंच जरा बोल्ले, तें कांहीं त्यांना सहन झालं नाहीं आ णि दुसरेच दिवशीं काशीयात्रेला गेले!!! घर मात्र ठेवलं, बाकी स गळा उन्हाळा!!! आधीं ह्मणा, फारसं होतें काय त्यांच्या जवळ, पण त्यांची रहाण्याची टीप एखाद्या श्रीमंता सारिखी! दोन एक हजारांचीं खतें होतीं, तीं ज्यांचीं त्याला बोलावून आणून फाडून टा कलीं. जवळची शिल्लक आणि सासूबाईचे दागीने घेऊन चालते झाले. माझ्या दागीन्याकडे मात्र त्यांनीं कसं तें पाहिलं देखील नाहीं. सरासरी वर्षाच्या बेगमीचें धान्य घरामध्यें. तेव्हां पासून खर्चाला लागेल तो पैसा पुरवण्याचें काम माझ्याकडे !!!

(इतक्यांत आनंदी येते तीस पाहून)

यावं यावं मिसेस रंगराव. आज बाई मला वाटतें पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगव ला, ह्मणून हे आपल्या सारख्या जिवलग मैत्रिणीचे पाय आमच्या घ राला सहा महिन्यांत लागले! बरं बाई, इतके दिवस माझी भेट घे तल्यावांचून तुमच्यानं कसं राहावलं असेल कोण जाणं!

आ०—( दु:खित मुद्रेनें ) काय करूं बाई, जिवाला आतांशा चैन ना हीं, त्यामुळें कांहीं एक करूं नये, कोणाजवळ बोलूं नये, कुठें ज ऊं नये, असं झालें आहे तुमचे निरोपावर निरोप दोन तीन आले आ णि सासूबाईनीं आग्रहच केला ह्मणून आज आलें

म०—एकून मीच मात्र आपल्या मनांत उगीच ह्मणतें कीं काय जो माझी जिवलग मैत्रीण या जगांत, ती आंनदी—असंच ना?

आ०—ह्मणाबाई तुह्माला वाटेल तसं. तोंड तुमचं, शब्दाच्या मालकीण ही तुह्मीच, जसं वाटेल तसं ह्मणावं.

म०—एकून तुझाच पगडा माझ्यावर?

आ०—बाई मला कांहीं हें असलं बोलणं समजत नाहीं.

म०—यांत न समजण्या सारिखं असं गुढ तें मी काय बोललें?

आ०—आतां एकन दोन—कुठवर मी सांगत बसूं? मथूबाई, तुमच्या पुसण्याला उत्तर कसं द्यावं हें मला नीट कळत नाहीं. आतां झालं ना? मी आपली वेडी हो!

म०—बरीग बाई तूं वेडी असशील! वेड घेऊन पेडगांवाला जाणारी भली तूं! मी आतां पर्यंत असं समजत होतें कीं, स्वतंत्रता प्राप्त करून घेतल्या पासून शहाणपणाचा कुर्रा माझा ज्यास्ती, पण बाई तुझ्या कुर्र्यानें तर मला अगदीं लाजिवलन!

आ०—असले हे अचरट शब्द माझ्या जन्मांत कधीं मी ऐकिले नाहींत.

म०—हो, तुला कशानं ऐकण्याचा प्रसंग येणार! तुझ्या सारख्या शहाण्या बायका स्वतंत्रता शिकून तयार होतील तेव्हां ना कुणी असं छद्मी बोल णार! नाहीं तर मेल्या आह्मी! मिस्तर रंगराव आपल्या शहाणपणाची रोज उठून तारिफ करीत असतात, तिचा अनुभव आज बाई मला

आला खरा. बरं कसं काय, आज इतक्या दिवसांत कां आली नाहींस?

आ०—मथांशी एकदा सांगितलेंना कारण, कीं आतांशा जिवाला बरं नाहीं वाटत. यायचें तें काय, मी आहेंच देवानें चार दिवस राखून ठाळे मिठावे ह्मणजे—

म०—कां कां गोंडवरलोस कां? देवानें तुला काय ह्मणून कमी केलं आहे? नांवा प्रमाणं रंगेल तुझा नवरा आहे; तूं पाहिजे तें केलेंस तरी तुला कुणी बोलणार नाहीं; बोलशील, हासशील, फिरशील, फिरायला जाशील, व्याख्यान देशील, पुनर्विवाहाच्या कामाला मदत करशील, फयान्सी ड्रेस करशील, पुरुषांचीं अंतःकरणें आपल्याकडे ओढून घेशील तितकं थोडंच; असं असतां गडे तूंग कां अशी कष्टी होतेस? बाई मला फार वाईट वाटतं.

आ०—मथूबाई, दैव सगळ्यांचं सारखें का वांटलें आहे? जसें ज्या त्या दैवीं असेल तसं त्याला सुख मिळायचें तुह्मी कां उगीच माझ्या करितां वाईट वाटून घेतां?

म०—आणंदी अग कसलें छान तें पुण्याचें संगीत नाटक आलं होतो तुझी मी किती वाट पाहिली! तुझ्या करितां तिकीट देखील आणून ठेविली होती. पण आलीसच नाहींस. एक वेळां तर बायकांची तिकिट मुळींच नव्हती ह्मणून मी पुरुषाचा वेष घेऊन गेलें होतें. तेव्हां तर जो तो माझ्या तोंडाकडे टकमक पाही आणि माझ्या शेजारी बसावें असं ज्याला त्याला वाटे. तेथें दोन चार इसम माझ्या नादीं लागले. चांगलेच लागले. ह्मणून नाटक आटपल्यावर रात्रभर त्यांच्या घजवळ गाडींत गोंधळ घातला. गेंप पालटण्याला आणि पुरुषाच्या बरोबर एकटें हिंडण्याला आपल्याला कांहीं प्रत्यवाय कां आहे आतां?

पुरुषांच्या बरोबरीनें आपली आतां स्वतंत्रता आहे आणि आपण कि या आतां देशाच्या सुधारण्याला लागलों आहोंत?

आ०—( किळस वाटून मनांत. ) आग लागली इच्या बोलण्याला, केव्हां माझी इथून सुटका होईल ती होवो. [ मोठ्यानें ] पर येऊं म आतां? कससच होऊं लागलं.

म०—सोडावाटरची बाटली आणवूं का. नाहीं तर तांबडपाणी- ब्रांडी आहे थोडी घरांत.

आ०—[ शब्द ऐकून उमदळते, परंतु दाबून ठेवते त्यामुळें घामाघुम होते. ] जाऊंद्या बाई एकदांची कशी मला घरीं. कुंकवाचा करंडा कुठें आहे?

[ इतक्यांत पत्र घेऊन एक शिपाई येतो. तें पत्र हातांत घेऊन फोडून वाचते ]

म०—अहा! दिवे ओंवाळा पत्र लिहिणारांना. त्यांत तारीख मुळींच नाहीं. बर वाचूं तर खरें. My hert bosom friend, dear wife. मी इंट्रोडक्शन कार्ड दिलेले गृहस्थ आपल्या भेटीस येऊं इच्छितात. हे मोठे कामगार असून आमच्या धंद्याच्या संबंधानें यांज पासून आपला पुष्कळ फायदा होणार आहे. तेव्हां पहिल्याच भेटीस आपल्या मोहक शारीरिक बाणांनीं त्याजवर असें संधान रोखून ठेवावें कीं तें कधींही चुकणार नाहीं आजच्या दिवसांत आपल्याला सोईवार जी वेळ असेल ती पत्र घेऊन येणाऱ्या मनुष्या बरोबर सांगून पाठवावी. आम्ही ठाण्यास गेलों.

Your dear husband.

कां ऐकलसना हें पत्र. अशींच तुह्मालाही पण येत असतील. बर येतेस का तूं आतां? नाहींच का बसायचें माझ्या घरीं? बर पुन्हां तरी केव्हां येशील?

आ०—आतां जातें आणि पुन्हां: बरें असेल त्या दिवशीं येईन. कुंकाचा

करंडा आणा तेवढा

म०—ईश! तें किती जणाच्या तरी म्हणून नांवानं लावायचं. मी वाई ते सोडुन दिलें लावायचं. कोण मेला त्रास. आतां आम्ही अखंड सौभाग्यवति झालों. तें एक दर्शक कुंकू आतां आम्हा स्वतंत्र बायकांना काय करायचें आहे?

आ०—बरं तर येतें मी. (मनांत) इनें एकदांचं जा म्हटलं म्हणजे मी या नर्कवासांतुन सुटलें देवा. दे कशी इला लवकर बुद्धी जा म्हणायला.

म०—बर तर या. पण येत जाहो अशा—(आंजदी जाते इतक्यांत दुसरें पत्र येतें, तें पाहून) तरी मला वाटलेंच कीं अजून ज्या अर्थी हा दारणीचा बैल आला. नाहीं, त्या अर्थी त्याजकडून कांहीं तरी निरोप आला पाहिजे होता. वाचूं तर खरं अर्थी हें पत्र—मग सांगूया त्या शिपायाला निरोप. मी जिवंत आहें तर केवळ पैशाची पुतळीच आहें. आग लाग मांच्या परिक्षांना. तो रंग्या अजून पर्यंत भिकच मागत होता, पण माझी शिफारस पोचण्या बरोबर ठपदिशी ५० रुपयांची लागली कां नाहीं चाकरी त्याला. बर हा माना काय या पत्रांत—"प्रियकरीण मधु, परवाचे दिवशीं चोरट्या प्रेमालिंगनाच्या योगानें माझ्या अंतःकरणाला जें सुख वाटलें त्याचें वर्णन करण्यास पूर्ण शृंगार उत्पन्न करणारा शाकुंतल नाटकाचा कर्ता महा कवी श्री कालिदास तर काय, परंतु इंद्रदरबारांतला प्रत्यक्ष वाचस्पति जरी खालीं उतरला तरी त्याच्यानें होणार नाहीं. असलें अद्वितीय सुख जिच्या प्रेमबंधनानें प्राप्त जाहलें, तिला करद्वय जोडून या दीन पामराची अशी विनंति आहे कीं,—(पत्र वाचायचें सोडून) कोण आहेरे तो शिपायी—उद्यां दोन प्रहरी तीन वाजतां बोलावलें आहे म्हणून तुझ्या यजमानाला सांग. आज म्हणावं बाईसाहेबांची तबियत

ठीक नाहीं. (शिपाथी जातो) बर पण या मेल्यानें मोत्यां विषयीं काय मजकूर लिहिला आहे तो अजून कुठें दिसत नाहीं. कोण आहेरे, राम्या, तुझ्याजवळ कांहीं जिन्नस दिली आहे?

रा०—नाहीं बाईसाहेब. त्यांनीं पत्र दिलें आणि मला धांवत येऊन पोंचवा यला सांगितलें.

म०—निघ मेल्या, जा हें पत्र घेऊन परत. मला त्याची गरज नाहीं ह्मणून सांग. आशिर्वाद ऐकणारी ही बायको नव्हे. (रामा पत्र घेऊन परत जातो, पत्र वाटेंत सांडतें.) (इतक्यांत रंगराव येतो आणि मथकडे पाहून)

रं०—"तुह्मा जातीच्या सुंदरांना कांहीं ही शोभतें."

म०—हा एक आला मेला टारगट. आमच्यांच्या पूर्ण भरंशाचा! याला तुस रं कांहीं सुचतच नाहीं. तें शकुंतला नाटक पाहाल्या पासून—जेव्हां तेव्हां "तुह्मां जातींच्या सुंदरांना—हे मेले खापरतोंडे! मूर्ती तर पहा कशा यांच्या जळकट आहेत त्या. यांना सुंदर स्त्रियांनीं भुलावं!—कांहीं ही शोभतें!—कायरे मेल्या शोभायचं!

रं०—किती तरी मधूर भाषण हें!!!—एकून धन्य त्या नाटककाराची!!! हा प्रयोग जर त्यानें आह्मांला करून दाखविला नसता, तर आमच्या या भारतीय स्त्रिया सांगकामशास्त्राविषयीं किती दिवस अज्ञानांधकारांत राहा त्या कोण जाणें! कवीश्वरा तुला नमस्कार असो. कारण उष्णता व कामज्वराच्या असह्यतेनें उर्वशी कन्या शकुंतला, तिला तिच्या प्रियसख्या लतामंडपांत सितोपचार करीत बसल्या असतां दुष्यंत राजानें आडून पाहिलें, त्या वे ळीं त्याला जितकें सुख प्राप्त जाहालें असेल, त्याच्या दसपट या वेळीं मला जाहालें आहे!!! कारण ही साक्षात् शकुंतला प्रत्यक्ष दुष्यंत राजा,

जवळ एकांत स्थळा प्रमाणे सलज्ज होऊन बोलत आहे!! कवीश्वरा, खरो खरच, हा माझ्याच एकट्यावर नाहीं, परंतु आह्मां सर्व सुधारेच्छु मनां वर तुझा अनुग्रहच समजला पाहिजे?

म०—ही असली मेल्यांची सुधारणा! या चावटपणा करितां स्त्रियांना स्वातंत्र्य द्यायचें—आणि त्याला सोंग काय ह्मणले, देशाचा सुधारा! देशाचें कल्याण!—तो दुष्यंत राजा किती रूपवान! त्याचें बल किती! त्याचा पराक्रम काय! त्याला धैर्य किती! आणि तो नीतीमान केवढा! असा तु मच्या सारखा तो नवऱ्यांच्या आणि विशेषें करून मित्रांच्या स्त्रियांवर का नजर ठेवीत होता? आग लागो तुमच्या असल्या सुधाऱ्याला! द्रव्य हीन, बलहीन, आणि बुद्धीहीन, पुरुषांची स्त्रियांच्या अनुसंगानें प्रौढी होत असते, त्यांतलेच तुह्मी. कशाचे रे पुरुष? आणि कशाचीरे सुधारणा करतां?

रं०—"किती तरी करूं मन धरणी" आहा, क्या बात है. तुमच्या सारख्या सुंदर स्त्रियांच्या तोंडून निघालेले हृदयभेदक शब्द हींच आमचीं प्रिय भूषणें!—

म०—मेला निर्लज्ज! बर रंगू, तुला काल सांगितलें होतं तिकडे गेला होतास क?

रं०—सरकार, I mean, राणी सरकारची आज्ञा मोडून राहावं कुठें, केव्हांच काम फत्ते करून आलों. चंदनी पेटी मोठी सुरेख झाली आहे. तोडे हि तयार झाले आहेत, पण तीन तोळे सोन्याची तूट आली तेवढें सोनें आणण्या करितां गोपाळशेटची वाट ५ वाजे पर्यंत पाहायची आहे.

म०—(घड्याळांत पाहून) पांच वाजून दहा मिनिटं झालीं, अजून कोणते मुड्ये पांच वाजायचे आहेत?

रं—दहा मिनिटस वर झालीं? जातों तर मी आतां (जातो)

(इतक्यांत फडनिसाचे चिरंजीव येतात.)

फ०—कांहो, आहेत कां कोणी घरांत?

म०—या या, आंत तर आधीं या, मग तरी चौकशी करा कोणाची ती.

फ०—ओहो—आपणच आहात कां? कसा काय विचार आहे?

म०—ठरल्या प्रमाणं—ड्रेस करून येतें आणि फिरायला जाऊं—पण मी गाडी वांचून नाहींरे बुवा यायची, आपले पाय दुखतात.

फ०—पाहिजेल,तें तयार आहे. इथून पायाने चालायचें नाहीं म्हटलें, तरी उचलून नेऊं. मग तर झालें ना?

म०—असं कांहीं बोलत जा, चालेल. कोण आहेरे, शंभ्या, अरे शंभ्या, मी रात्रीं आठ वाजतां परत येईन तों पर्यंत स्वयंपाक तयार करून ठेव· राम्या, खबरदार घराच्या बाहेर जाशील तर. कुणी आलं तर सांग आतां मी बाहेरून येतें, आणि त्याला बशीव. राम्या मेल्या, समजलास, नीट समजलास ना? (फडणीसाकडे पाहून) अमळ तसदी घ्या मी आलें च यांगिड्रेस करून (दोघें जातात.)

(विधवा साळू येते आणि रामा गड्याबरोबर बोलत बसते)

सा०—कारे रामजीबुवा, मला तर सांगितलंस मथूबाई आतां येतील, त्याला पुष्कळ नाहीं कां वेळ झाला?

रा०—अन् मग? बसाच.

सा०—हा मेला बसाच म्हणतो आहे! कोणग बाई आश्चर्य! बरं कारे रामजी बुवा, खरं कारे ही गोष्ट, कीं माझ्या सारख्या बायकांच्याविषयीं कांहीं खटपट तुमच्या घरांत चालली आहे?

रा०—खतपत अन् कशाल्नी?

सा०—अरे हे पाहालेस कां माझ्या डोक्याकडे.

रा०—बर मंग, हाये डोंक तुमाला.

सा०—अरे तस नाही, पण—

श०—काय जनु बोलल्यात समजत श्री नाई.

सा०—हा मेला लट पोळच आहे. माजला, मात्र.

( इतक्यांत मथू येते. )

म०—( साळूला पाहून ) ए राडे साळे, कायग केलंस हें?

सा०—ठिक. माझें डोकें उघड झालें म्हणून मी रांड साळे झालें का?—आपला कांहीं गांवांत डंका पिटत नाहीं नसा?

म०—काय? डंका काय पिटायचा आहे? आह्मी स्वातंत्र्य संपन्न स्त्रिय आहोंत. चाहील तें करूं!

सा०—आतां माझी कांहीं सोय?

म०—सोय काय? त्याच करितां मी अवतार घेतला आहे. केस वाढव आणि ये मजकडे ह्मणजे तुला अखंडच सौभाग्यवती करून टाकतें, ह्मणजे झालं कीं नाहीं? स्वातंत्र्याची दीक्षा देण्याचा उशीर! कीं तूं लागलीच बनलीस माझ्या सारखी! साळू जेव आतां इथेंच.

( जेवायला जातात )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ—माधवरावाची माडी

(वामनराव रस्त्यांतुन जात असतां माधवराव त्यास माडीत हाक मारतो.)

मा०—( खिडकींतून वामनरावाकडे पाहून ) ओहो! मिस्तर वामनराव—

वा०—( खालून वर पाहून ) नमस्कार माधवरावजी. कसें काय आहे?

मा०—या या तर खरें वर जरा.

वा०—मेहेरबानी करावी—जरा थोडें बाजारांत काम आहे.

मा०—बरें पण तर खरें, मी तुमचा जिन्नस बाजारांतून आणून देतों आपल्या गड्याकडून.

वा०—[ वर येऊन ] जाऊन द्यान मला! तुह्मी कामाचीं माणसें, आह्मी रिकामटेकडे! तुमच्या एकेक फुकट जाणाऱ्या क्षणानें देशाचें केवढें नुकसान होईल!!!

मा०—तें काम तर लागलेंच आहे रोज. पण आज चार गोष्टी तर आपण बोलूं! कोण आहेरे राम्या, वर ये असा पाहूं. जा आणि यांचा बाजारांतून काय जिन्नस आणावयाचा असेल तो घेऊन ये. ( रामा वामनरावाची पावशेर खडीसाखर आणण्यास जातो )

वा०—हल्लीं देशसुधारण्याच्या संबंधानें तुह्मा उभयतांविषयीं गांवांत डंका सुरू झाला आहे!!

मा० [ हसरें तोंड करून ] खरेंच का? मग पब्लिक ओपिनियन आम च्या विषयीं काय आहे?

वा०—पब्लिक ओपिनियन काय फारच छान! आमच्यांत कुळदीपक ह्मणून जो किताब आहे त्याला आपण पात्र आहात न कीं काय!!

मा०—याच करितां मी तुह्माला पहिल्यापासून सांगत होतों कीं, तुह्मी

या देशसुधाऱ्याच्या फंदांत पडा. ह्मणजे आमच्या प्रमाणें तुमचा आज ला लौकीक नसता झाला?

बा०—माझ्यी आई तो कितावत तुमची तुझालाच!!! वस्तन् काय

मा०—वरें सरकाराला फसिवण्याची मी एक अशी शान्दार युक्ति काढ ली आहे, ती समजली का तुला?

बा०—बाबा मेहेरबानी येवढी कर, कीं सरकारच्या मात्र वाटेला जाऊं नकोस. मारच खाशील सज्जड.

मा०—छुःश—नान्सेन्स, तसला कांहीं अपराधी प्रकार नाहीं. पण खऱ्या अकलेचा आहे. तूंच पहा आणि सांग. सरकारानें "वुइडो म्यारिएज" आक्ट काढल्याला किती वरें वर्षं झालीं!! बरींच झालीं असतील नाहीं? आणि आमच्याही लोकांनी "वुइडो म्यारिएजेस" करण्या विषयीं पुष्कळच खटपटी केल्या असतील तुह्मःला नाहीं का वाटत?

बा०—बर मग? पुढें काय ह्मणता?

मा०—ह्मणायचें काय? अजून पर्यंत या कामाला जसें यश यावें तसें कांहीं आलें नाहीं.

बा०—आमच्या मतानें तर या अशास्त्र राहिलें पण तुमच्याच इतर मता प्रमाणें बिभत्स प्रकारास यश येण्याचें कठीण.

मा०—काय पुनर्विवाह प्रकर्ण बिभत्स ह्मणतात?

बा०—छे छे. मी नाहीं बुवा ह्मणत. कोणाला वितंडवाद करण्याला सामर्थ्य आहे बुवा. तुमच्याच सारिखें का नाहीं बोलके तुमच्या

जवळ. आमचें काय जातें त्यांत?

मा —नाहीं नाहीं. असें नका ह्मणूं. पाहिजे तर मी सशास्त्र ठर वून देतों.

वा०—हो. चाल तुह्मी ठरवून! चार शास्त्राध्ययन केलेले पंडितच रहा! बरें हें राहूं द्या आतां, तुमची युक्ति सांगा ह्मणजे झालें.

मा०—"डायव्होर्स आक्ट" पास करण्या विषयीं सरकाराकडून घ्या लायचें.

वा०—मग काय होईल?

मा०—भडाभड पुनर्विवाह होऊं लागतील.

वा०—तें कसें काय?

मा०—कसें काय ह्मणजे अजून संशयांतच तुह्मी! अहो ज्या नवरा बायको ची एकमेकांवर प्रीती नाहीं, ते लोक हा अ.क्ट अमलांत आल्यावर भरा भर कोर्ट मार्फत आपापलीं लग्नें रद्द नाहीं का करून देणार? मला वा टतें नाइंटी परसेंट, लोक असें करतील. मग नवऱ्याच नवऱ्या आणि नव रेच नवरे!!! मग ह्या हवीं तितकीं लग्नें करून! अहो सद्यां विधवांची संख्या जरा लहान आहे ह्मणून पुनर्विवाह होत नाहींत आणखी काय? पुनर्विवाह अशास्त्र नाहीं हो—सशास्त्रच आहे. पण त्याला हा एक मो टा आडथळा आहे, त्याच्या पुढें शास्त्राचा कांहीं इलाज चालत नाहीं.

वा०—(मनांत) काय या खुळ्या बरोबर बोलावें—(मोठ्यानें) वाहवा वाहावा—फारच पसंत युक्ति!!!

मा०—आणखी दुसरें असें. स्वतंत्रता स्त्रियांना नसावी आशा बद्दल जुन्या लो कांचें मत सर्वथैव अन्यथाचें आहे असें आतां अनुभवा अंतीं थोडथोडें कळूं लागलें आहे. आमच्या सारिखे राहूंद्या, पण साधारण नवरे त्यांच्या

खिजगणतीत देखील नसतात!

वा०—तें यांचवेंच अनुभवला. पण तुमच्या सारखे आणि साधारण नवरे या शब्दांचा अर्थ मला नाहीं कळला!

मा०—तो सबजेक्ट आहूया तो तुमचा नाहीं. त्याजबद्दल स्वतंत्र विचार आह्मी करूं आणि त्या संबंधानें कांहीं नियम केले पाहिजेत बरें पण "डार्कहोर्स" भुक्टा विषयीं आमची योजना तुह्माला पसंत पडली कीं नाहीं, तें सांगा.

वा०—फार नामी. उत्तम. पसंत. खरोखर सर्वांत पसंत!!!

(इतक्यांत रामा गड्डी खडीसाखर पुडींत घेऊन येतो.)

मा०—रम्या आण इकडे ती खडी साखर (रामा पुडी आणून ठेवतो, ती हातांत घेऊन) वामनराव, बुवा बोलतां बोलतां आमचा तर घसा सुकून गेला. आपण ही खडीसाखर खाणार.

वा०—घसा सुकला असेल आणि खडीसाखर खायचीच असेल तर मी आणखी आणवितों पण सोडावाटर सोडून हें दुःखिन्ह काय? तुह्मी स्वर्गाचे लोक!!!

मा०—(पुडी सोडीत असतां) अरे वः या पुडीच्या कागदा वरील अक्षर फार मारू आहे! हें "लव्हलेटर" असावें बुवा!

वा०—पाहूं पाहूं—

मा०—[पत्र आपल्या बायकोचें असावें अशा समजुतीनें] तुह्माला अशा लेटर्स मधील मजकूर कशाला हवा—तुरून हें बाळपण पहा.

वा०—बरें बुवा तुह्मीच वाचा, आतां आह्मला रजा द्या ह्मणजे झालें.

मा०—[पत्रांतील मजकुरावर लक्ष गुंतून] बरें तर या [वामनराव जातो] [आपल्यासीच.] विशेष करून स्त्रियांच्या अंगीं पातिव्रत्य उत्पन्न व्हावें अशा प्रकारचें कांहीं स्त्रीशिक्षण त्यांना मिळत नाहीं ह्मणून "ओल्ड फुल्स" ह्मणत असतात तें खरें का खोटें याजविषयीं तर या पत्रा वरून संशय उत्पन्न होतो. असो, पण हा विचार करण्याचें आपल्याला

कारण? जगाचें कल्याण स्त्रियांच्या हातून व्हावें एतदर्थ त्यांना शिक्षण पाहिजे, आणि त्या शिक्षणा करीतां त्यांना आपण स्वातंत्र्य दिलें, व दुसऱ्या स्त्रियांना देण्याची खटपट — पण हें "लेटर" वाचून आपल्या तर आंगाची आग होऊन गेली आहे! तिचा या वेळेस आपण प्राण घ्यावा असें वाटूं लागलें आहे! परंतु कायद्यानें सर्वस्वी आपण नडलों आहोंत, याला इलाजच दुसरा नाहीं. तो "डायव्होर्स आक्ट"--वरें तिला, विचारून तर पाहूं--कूं होते का—राम्या, ज्याच मडमसाहेबकु बलाव. बोलो अबीच्या अबी आना.

रा॰ —(मथुला निरोप सांगून परत येतो.) येत नाहीं ह्मणून बाईसाहेब ह्मणाल्या.

मा॰ —जा, आलेंच पाहिजे ह्मणून सांग.

रा॰ —[परत निरोप घेऊन येतो ] येतच नाहीं ह्मणात.

मा॰ —[आपल्यासींच] जुलमाची गोष्ट!!! आमची बायको आणि येत ना. हीं ह्मणते!! मेहेरबानी करून वर थोडावेळ येऊन जावें असें सांग जा जा वहानचोदा लवकर!

रा॰ —(आपल्यासीं ) ह्यो वर वड्याचं तेल वांग्यावर [परत निरोप घेऊन येतो] त्या ह्मणतात असा पहिल्यांदा निरोप पाठवायला काय झालें व्हतं?

मा॰ —पहा काय मजा आहे! चुकलों पदर पसरला ह्मणायें याचें एकदाचें. (मथु येते)

म॰ —कां कां आज फारशी ताहान लागली. औषध कांहीं घ्यावेसें आलें वाटतें?

मा॰ —हें पत्र पहा कोणाचें आहे तें?

म॰ —(मनांत चरकून पण धिटाइनें) मला पाहून काय करायचें आहे. मी नाहीं असलीं घाणेरीं पत्रें पाहात बसत.

मा० —याणेरीं पत्रें आणि करणी निर्मळ आहे?

म० —बस बस्स—तोंड आवरून बोला. मला नाहीं असलें आ डायचें.

मा० —मथु आपणच कां नाहीं पण?

म० —गांवांतल्या साऱ्या मथ्या मेल्यात असतील?

मा० —पण ही मथु आपणच कीं नाहीं?

मा० —[ पत्र फाडून खिडकीच्या बाहेर टाकते] असली हीं मथू तर काय करायचें आहे?

मा० —"डायव्होर्स" आक्ट पास झाला ह्मणजे सांगेन—आतां रागाला बो लतों आहे तर आपल्याला ज्युडिशिअल डिसोज झाला आहे ना?

म० —(मनांत) याच्या तंगड्या याच्याच गळ्यांत घातल्या पाहिजेत. (मोठ्यानें) आपलेच गुण कुठं उधळले असतील.

मा० —असें काय ठीक—तर तुमचें आणि आमचें आजपासून बनायचें नाहीं. आपण वाट फुटेल तिकडे जा, नाहीं तर आह्माला सांगा.

म० —बरें, पाहीन तमाशा कसें कोण कुठें जातें तें.

(इतकें बोलून मथु जाते.)

मा० —(आपल्याशीं) बेळेवर मान न राहिल्यानें इचा आपला तर वेबनाव जाहा ला. आतां आपलें एकत्र राहणें होत नाहीं हें खचित. परंतु आपल्या वि द्वत्तेचा यत्किंचित् उपयोग नाहीं, अशीं येव्हां पासूनच आपल्याला मे झर्स घेतलीं पाहिजेत. कारण कुरूपणाचा आरोप आपल्यावर येतां उपयो गी नाहीं, आणि असेंच विशेषीं मेंटिनन्स बद्दल तिनें आपल्यावर फिर्याद केल्यास आपल्या जवळ भक्कम पुरावा तयार करून ठेवला पाहिजे. (मथुची पत्रांची शोधतो. त्यांत दुसरीं पत्रें आणि सोन्या मोत्याचे याला ठा ऊक नसलेले दागिने सांपडतात.) अरे [आश्चर्य करून] यांतलें मला आ जपर्यंत कांहीं कळलें नाहीं!! —[रागानें] बरें बरें, असो.

## प्रवेश ६ वा

स्थळ देवीचें देऊळ.

पात्रें— मथू, आनंदी आणि सरस्वती.

मथू —( देवीच्या देवळांत आल्यासरसीच ) केल्या कर्माचा पश्चात्ताप हो ऊन आतां काय उपयोग? कांचेचें भांडें, जसें झालें एकदां धक्का लागून फुटलें, म्हणजे निराशी, त्या प्रमाणें आह्मा स्त्रियांचें जिवित, म्हणजे उत्पन्न होणें, हीच कोणी एक पातिव्रत्यरूपी कांच, हिला कां एक वार व्यभिचाररूपी दुष्कर्मांचा वारा लागला, म्हणजे ती स्त्री जन्मभर निरुपयोगी. मग म्हणून त्या स्त्रीला कुलीन स्त्रियांचा सहवास दुर्लभ, नाहींच म्हटलें तरी चालेल, मग अशा स्त्रीला जन्मभर टारगट मंडळीचा सहवास!!! फार झालें तर तिच्या जोडीच्या अव दसांचा!!! आमच्या यजमानांच्या खुशी करितां म्हणा, अथवा वडील माणसांचा कान तोडण्या करितां म्हणा, त्यांच्या सांगणी वरून मी स्वतंत्रतेची दीक्षा धारण केली आणि फयान्सी ड्रेस करून सोय लावून घेण्या करितां पहिल्यानें आठ चार दिवस रात्रीचो वा हेर पडलें, आणि दोन तीन वेळां कुठें लेक्चराला गेलें मात्र, झाला मा झ्या नांवाचा शहरभर डंका!!! अमक्या अमक्याची बायको झाली त यार. ती अमुक ठिकाणीं यायची अशी कुई मात्र पसरायची, कीं ति ला पाहावया म्हणूनच लोकांची गर्दी!!! असा पुरुष मंडळींत तमाशा चालला! बरें आमच्या बायका, माझ्याच मैत्रिणी, कधीं वाटेंत भेट ल्या, आणि कुणाला मी होऊन जर हाक मारली--त्या तर नाहींच बोलायच्या मज बरोबर--पण हाक ऐकून नाक मुरडील, आणि आप सांत बोलत, "नकोगबाई इच्या जवळ बोलणं, इचं वारं देखील उपयोगी नाहीं. कारण घरांत समजलं तर बोल बोलून खातील" बरें अलिकडे आमच्या घरांत तंटे लागल्यापासून आमच्या सद्गुणांचा

स्त्रीशिक्षणामुळें, आणि तदंतर्द्वारें प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्या पासून रूढचां च्या शहाण्या मंडळीच्या मता प्रमाणे अज्ञ स्थितींत असणाऱ्या स्त्रियां च्या साहाय्य सद्धर्म नीतीचा किती शोचनीय परिणाम होतो, आ णि त्या दुःखानें मी अगदीं होरपळलें आहें — देवा शहारे आंगावर ये तात — तो प्रसंग इतःपर तरी माझ्या भगीनींवर येऊं नये, ह्मणून मी होऊन गुणाजवळ कळवळ्यानं आणि गहिंवरून सांगूं लागलें, तर कुणी ह्मणावं, काय ग थोर्ड मेली, "नटून करून भागली न देवपुजेला ला गली" इतकं जों एक ह्मणते तोंच दुसरीन ह्मणावं, "हो — मेली ठाऊक, नेमाधर्माची न शिकवा वर्णाची" तिसरीनं तरी उगीच ब सावं, पण नाहीं, "वृद्धा नारी पतिव्रता न् घवळा नंदी गुणवंता" असं एक न दोन, बोलबोलून माझं तोंड खुडुक करून टाकावं. झालंरा! शेवटा माझी हो अवस्था झाली! बाहेरचीं माणसं, ह्मणजे माझ्या मैत्री णी, त्यांना मी नकोशीच झालें. सास सासऱ्यांनींच जर सोडलं तर इतर स्वकीय माझा अंगिकार कां आतां करतील! बरं ज्यांच्या फुशीनं — फुशीने ह्मणायचा कांहीं भाग का वाटेत — आपल्या "मोहक शारीरिक वागांनीं" काय याचा अर्थ? मी झालें अशी — तर आतां रोज एक पत्र न् दागीना काढून तंटा. जसं कांहीं वेड लागून गेलं!!! देवा काय ही आमच्या शिकलेल्या मंडळीची अक्कल! पहिल्यानें या कुठे शेण खाय ला गेली होती!! त्या कोण, सरस्वति आणि आनंदीबाई या इकडे ये ताहेत. अग बाई, मी या देवळांत आलें ह्मणून आतां त्या काय बोलतील कोण जाणं! ती सरस्वति तर मला खाऊन टाकील, ( आणंदी आणि स रस्वती दुरून येत असतां आपसांत. )

स० — आणंदबाई, ती पाहालीत का कोण उभी आहे ती?

आ० — तिला काय पहायचं तें मेलं. हात पायाचा एक जोध ईश्वरानं नि र्माण केलेला आहे.

स० — पण तो आज आपल्या दगडाच्या देवीच्या देवळांत कशाला आली

आहे?

आ० —तिला काय तीमाणुस का आहे तें कुत्रें पहा, देवळांतही येतें आणि उकीरड्यावर पण लोळतें. त्याला बरें वाईट समजतें का आहे नाहीं? तशांतलें तें जनावर: तिला कांहीं समजतें का आहे?. पहिल्या पहिल्यानें चार मैत्रिण व अविचारी लोकांनीं आणि तिच्या नवऱ्यानें तिची तारिफ केली, पण ती आतां पस्तावली आहे! पहा तरी तिचा चेहरा कसा उतरलेला दिसतो आहे तो!

म० —खरंच बाई, तिचा चेहेरा तर अगदीं गोरागुरा होऊन गेला आहे! आतां तिचा जीव पस्तविला असेल, तर "दिवस गेला हेटामेटी न चांदिण्यांत कापूस वेची," अशी नाहीं का तिची अवस्था झाली! मी दोन टोले तिला मारीन आतां.

आ० —सरस्वती, त्या वांकून तुझें कांहीं अडलें का आहे? देवीच्या दर्शनाला आपण आलों. दर्शन घेऊन जाऊं तशांत ती होऊन ह्मणाली च कांहो, तर तेवढ्या पुरतं ह्मटलं मेलं अहो न सोडून दिलें. अशा चारगट बायकांसी प्रत्यक्ष बोलण्याचा प्रसंग न येईल तितका बरा. ह्मण आहे कीं, "दुर्जनं प्रथमं वंदे"

स० — मी आपली तिला एक चुणुक तरी मारीन.

आ० —सरस्वती, "कळचेटी न डाळ बाटी" असली ती भयंकर बायको आहे, नको उगीच तूं तिच्या वाटेस जाऊं तिला कांहीं लाजलज्जा, का मीड मर्यादा आहे? बोलूचालून दगड टाकून चिखल अंगावर उडवून घ्यायचा इतकेंच. त्या पेक्षां देवाधर्माच्या दुसऱ्या चार गोष्टी बोलत बसलें, तर काळतरी चांगला जाईल.

म० —( दोघी जवळ येऊन ) कुलवधुनो, नमस्कार करतें. मी तुमची एक दीन झालेली मैत्रीण आहें.

आ० —नवलच बाई हें आज! अहो मथुबाई, हें काय असं पण?

स० —"वरून दरून मरून जाई न काळीज बाका खाऊन जाई" अशांत

ला कांहीं प्रकार असेल हा! त्या निराकार, निरावयव, आंधळ्या, बहि ऱ्या, मुक्या, निर्गुण अशा देवाच्या तुम्ही भक्तीणी, त्या तुम्ही आमच्या ना का तोंडाच्या आणि डोळ्याच्या देवाच्या देवळांत येऊन आमच्या पाया पडता — तेव्हां कांहीं मतलब असेल.

म० — नवऱ्याने असे छद्मी बोल बोलूं मला मरणापेक्षांही जास्त दुःख झाले आहे!

स० — हो "सुटक सोवळं न बुटक ओवळं" अशांतले तुम्ही दुःख, नाहीं तर काय? तुम्ही सुधारलेल्या बायका, त्यांत देशकल्याणाची काम गिरी घेतलेल्या पुरुषां बरोबर फिरायला रुळलेल्या, आणि धर्म संधाने आ हार प्रकरणीं अन्न देवलाही लाजिवणाऱ्या! त्याच प्रमाणें विहार संधानें चतुष्पदानांही मागें हाटविणाऱ्या, तुम्हांलागि कशानें दुःख व्हावें?

म० — सरस्वतीबाई, तुम्ही ह्मणाला त्या सर्व गोष्टी खऱ्या. पण खरेंच सांग तें, त्याच गोष्टी माझ्या दुःखाला कारण झाल्या आहेत!! या आणखी बा ई, आपल्या नवऱ्याच्या फासांत सापडल्या नाहीत हें सोन्याहून पिवळ झालें. नाहीं तर माझी आणि त्यांची आज एकच स्थिति झाली असती. त्या मोठ्या भाग्यवान. मी पोटांतली गोष्ट आतां तुमच्या जवळ सांगतें. पतीची निंदा करूं नये असा जुना शास्त्रार्थ आहे, त्यानें मला किती दो ष लागेल तो लागो, मला तो पत्करला. पण काय उघड करून सांगू बा ई. देशकल्याणार्थ तो स्वतंत्रतेची दीक्षा मी धारण केल्या पासून कुटुंबा मध्यें असून जें संसार सुख मला मिळावयाचें त्याला मी आतां या जन्मांत तर आंचवलें. आमचा सदोदित ३६ चा आंकडा त्यांनी घरात यावें, कीं मी बाहेर पडावें, त्यांची बाहेर जाण्याची वेळ ती माझी घरांत येण्याची. न कुणी बोलता न सवता- पडल मी स्वच्छंदीनी स्वतंत्रतेच्या छायेंत!!! झाली एक गोष्ट. आतां दुसरी ऐका देश कल्याणाचें काम ह्मणून जेंमी केलें तें सुधारलेलीं नाटकें पाहून — तुम्हा कुलस्त्रियांना देखत तसले वा गेरडे शब्द तोंडावाटे काढण्यास मला लाज उत्पन्न होते — यांत समजा.

असलीं नीच कर्मे करण्यास मी प्रवृत्त झालें! यांचें देशकल्याण ह्मणून काय, हें जें मी समजलें तें देशकल्याण ह्मणजे देशाची नासाडी. ज्यांत देश भिकेस लागणार, तो आजन्म लागण्याची हे खटपट करणार! देशसुधारणा या कामाला जो गनिम आड येऊन बसला आहे, त्याला हे पिशे मित्र मानतात! आणि ज्याची आज खरोखर गरज नाहीं, व जे हटकून आपलें नुकसान करते, त्यांचा रात्रंदिवस नादीं लागतात! या गोष्टी तर तुह्मी पूर्वीच समजल्या अहात. परंतु तुह्मा विद्वानां-पण माझी तुमच्या अगदीं उलट गोष्ट झाली तुमच्या सगळ्या कल्पनांचा मी स्वतः अनुभव घेतला, त्यामुळें त्यांत खरें मर्म काय आहे तें मला कळलं. देशसुधारणा ह्मणजे आह्मा स्त्रियांची सर्व लज्जा खुंटीवर गुंडाळून ठेवून स्वतंत्रतेच्या मिषानें आह्माला पुरुषांत मिसळायचं! काय आज याजवांचून खोळंबलं आहे? स्त्रियांची जात आधींच चंचल, तशांत असल्या फुसक्या शिक्षणानें संस्कृत, आणि त्यांत रात्र दिवस प्रेमरसानें भरलेल्या पुस्तकांचा सहवास आणि या सगळ्यावर अनेक पुरुषांच्या पूर्ण शृंगाररसयुक्त प्रेमलोदर्शित श्रेष्ठांशी ओळखी!!! मग परद्वाराला दूषित ह्मणवेल काय?

स०—इश कसले केले हे विचार! आग लागो त्यांना, जळतच नाहींत!

म० — विधवांचीं लग्नं व्यभिचार बंद करण्या करितां ह्मणून हे करणार! परंतु व्यभिचार ह्मणजे काय हें यांच्या ज्ञानाला जसं कांहीं कळतच नाहीं. पति असणाऱ्या स्त्रियांनीं निदान स्वाटच्या करून, आणि विधवांनीं लोकांच्या संमतीनें परपुरुषभोग केला असतां व्यभिचार नाहीं!!! असा यांचा शास्त्रार्थ!!

स० —आग लागो त्या विचारांला! देवा माझ्या कानांत खोट.

म० —सरस्वती, ऐकायला तिटकारा करूं नकोस ऐकून ठेव. हा प्रसंग तुजवर येईल, त्या वेळेस या माझ्या शब्दांची आणि तूं करीत असलेल्या तिटकाऱ्याची आठवण ठेव ह्मणजे माझ्या सारखी फसणार नाहींस कार-

ण तुझे यजमान परिक्षा उतरल्या पासून नौकरांच्या शोधांत आहेत. आणि त्यांची अशीच समजूत झाली आहे कीं, तूं विद्वान झाल्या पासून त्यांना चाकरी लागण्याची आशा नाहीं.

स०—हो बाई, मला आतांशा रोज रात्रीचं पढीवणं चालल असतं. पण मी एक ना दोन, जशी त्या गांवचीच नाहीं. सोळा सोळा वर्षांच्या आम्ही आतां धोडग्या झालों, आतां कां आम्हाला शाळेंत जाणं शोभतं?

मं०—माझ्याही मनांत असे विचार आले होते पण मी फसलें, आहें हो. मी शाळेंत न जातां माझी अशी स्थिती झाली!

स०—मी नाहीं बाई शाळेंत जायची आणि घरीहो शिकायची. जळ ला मेला शाळेंत पंतोजी पाठ थोपटणार— मेला म्हातारडा झाला म्हणून परकीच ना?

मं०—सरस्वती. आतां कुणी बायका शाळेंत जावोत अगर न जावे मी कांहीं म्हणून त्यांना उपदेश करायला जाणार नाहीं. कारण शिकणाऱ्या बायकांना माझी हकिकत सांगूं लागलें, तर त्यांना माझ्या सारखा अनुभव येई पर्यंत त्या माझी थट्टाच करणार! असो जि च्या जसं प्रारब्धीं असेल तसें घडून येईल. परंतु मी हें खास तुम्हाला सांगून ठेवतें. हल्लीं देशसुधारणुकेचें म्हणून जें वंड निघालें आहे आणि त्याच्या साह्यार्थ स्त्रीशिक्षण, स्त्रियांचें स्वातंत्र्य, स्त्रियांचा पुनर्विवाह, बालविवाह निषेध, वर्णसंकर, विपरीत धर्मस्थापना, वगैरे प्रकारांनीं जे लोक चार दिवस नव्या उमेदीनें नाचले, ते अवयव खेरीज करून मनुष्य कोटींतले निवळ पशु आहेत असा तर स्त्रीमतीनें माझा पूर्ण ग्रह झाला आहे! मग हा कुणाला कसाही वाटो!! या प्रकारांनीं देशाची सुधारणा बिलकूल न होतां, शास्त्रीय नीती आणि आचार यांचा ऱ्हास होऊन आपली पुढची संतती आपले सासरे, आजे सासरे, पणजे सासरे यांच्या सारखी पराक्रमी, अभिमानी, कुटुंबपोषक न होतां, अर्जवी, निलाजरी, आणि आजागलस्तनवत होईल!!! आमच्या मामंजिनी रोजगा

राज्य असतांना देखील कुणाला अमर्याद शब्द बोलूं दिला नाहीं, पण तच तुमचे आमचे यजमानांकडे पहा! रात्र दिवस कीं हो लोकांची पायमल्ली चालली आहे! आह्मी आपल्या बायकांना विद्या शिकवितों, आमच्या विधवांचे पुनर्विवाह करतों, आह्मी आपल्या बायकांना स्वातंत्र्य देतों, आठरा पगड जातीची आह्मी येकी करतों, असें ह्मणणारांच्या कुसांत देवानें कुणी सापडूं दऊं नये ह्मणजे झालें.

आ०— पुरेगवाई तुझं चऱ्हाट! भाजल्यावर विचार करणाऱ्या तुझ्या सारिख्या पुष्कळ असतात. करील तो भोगील. त्याची आपल्याला उठाठेव कशाला? आपण आपलें आहे त साडूं नये ह्मणजे झालं. सरस्वती, चला घरीं आतां. बराच वेळ येऊन झाला. कुणी बोलणारे आहेत कीं नाहीं आपल्याला घरीं. [सर्व जातात.]

(समाप्त)